महाराष्ट्र पोलीस

जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र 9819208279



## प्रेस नोट

दिनांक – ०८/०९/२०२६

# इंस्टाग्रामवर बोगस आय.डी. तयार करून स्वस्त दरात, आयफोन, इतर कंपनीचे फोन, फर्निचर विक्रीच्या नावाखाली जाहीराती करून, संपूर्ण भारतातील वेगवेगळया राज्यातील नांगरीकांची लाखो रूपयांची फसवणूक करणारी, संपूर्ण भारतामध्ये जवळपास सायबर पोर्टलवर ७५ तक्रारी दाखल असणाऱ्या CYBER FRAUD करणाऱ्या टोळीचा उल्हासनगर गुन्हे शाखेकडून पर्दाफाश.

उल्हासनगर परिसरात कार्यरत असलेली सायबर क्राईम करणारी टोळी इंस्टाग्रामवर **instgram** वर **360 Mobiles'** फर्निचर **jayesh mobiles , dhaval mobiles, Devamobiles, Nikhilmobiles, Nileshmoblies, Vivekcommonication, modern_mobiles** इत्यादी नावाचे बनावट ( **id** ) बनवून संपुर्ण भारतात वेगवेगळे राज्य – राजस्थान, आसाम, मेघालय, गुजरात, अरूणाचल प्रदेश, उत्तरप्रदेश, वेस्ट बंगाल, मिझोरम, हिरायाणा, जम्मू काशमीर , छत्तीसगड, इत्यादी राज्यातील वेगवेगळया शहरातील नागरीकांना अतिशय कमी किंमतीत आय फोन व इतर कंपनीचे मोबाईल फोन, फर्निचर व इतर वस्तू विक्री करण्याच्या खोटया स्वरूपाच्या जाहीराती प्रसिध्द करून, ग्राहकांना आकर्षित करून, त्यांचेशी चॅटींग करून, विश्वास संपादन करून, ग्राहकांनी ऑर्डर दिल्यानंतर पार्सल पॅकिंगचे बनावट व्हिडीओ आणि खोटे बारकोड तयार करून, सदरचा बारकोड हा पार्सलवर चिटकवून, त्या पार्सलचा ग्राहकांना व्हॉटसॲपद्वारे पाठवून, पार्सल पाठविलेबाबत संदेश देवून, ग्राहकांकडून ऑनलाईन पध्दतीने वेगवेगळया बॅक खात्यावर पैसे स्विकारयचे. आणि ग्राहकांना कोणतीही वस्तू न पाठवता त्यांचेशी संपर्क तोडून नागरीकांची मोठया प्रमाणात लाखो रूपयांची आर्थीक फसवणूक करणारी टोळी ही उल्हासनगर परिसरात राहत असल्याबाबतची खात्रीशीर माहिती पो.निरी. राजेश गज्जल यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाल्याने, सदर महितीच्या अनुषंगाने उल्हासनगर परिसरात राहणाऱ्या सायवर फ्रॉड करणाऱ्या टोळीस मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली घटकांअतर्गत वेगवेगळी पथके तयार करून, गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर यांनी छापा कारवाई करून एकूण ०५ आरोपींना अटक केली आहे. अटक आरोपींकडून १ लाख २० हजार रूपयांचे मोबाईल फोन जप्त केले आहेत.

सदर आरोपीना अटक केल्यानंतर उल्हासनगर पो.ठाणे गु.र.नं. ०२९९/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४),३१८(५),३(५) सह माहिती तंत्रज्ञान कायद कलम ६६(क),६६(ड) प्रमाणे दाखल गुन्हा उघडकीस आणला आहे.

Scanned with CamScanner

सदर गुन्ह्याचे प्राथमिक तपासात राष्ट्रीय सायबर पोर्टलवर या टोळीने वापरलेले मोबाईल फोन व ईमेल आय.डी. व मोबाईल नंबर यांचेशी संबंधित तब्बल भारतात वेगवेगळया राज्यात नांगरीकांची फसवणूक झाले बाबत एकूण ७५ तक्रारी नोंद झाल्या आहेत. तसेच गुन्हयातील अटक आरोपीत यांनी ११४ बॅक खाते वापर केला असल्याचे निष्पन्न करण्यात आले आहे.

**अशा प्रकारे इंस्टाग्रामवर जाहीराती पाहून आर्थीक फसवणूक झालेल्या नागरीकांनी गुन्हे शाखा, घटक –४, उल्हासनगर येथे संपर्क साधावा.**

प्रस्तूत गुन्हयाचा तपास अद्याप चालू असून, एकूण ०५ अटक आरोपींना सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

अशा प्रकारे सायबर क्राईम करणेसाठी इंस्टाग्रामवर वेगवेगळे आय.डी. तयार करून, नागरीकांची आर्थीक फसवणूक करणारी आंतरराज्य टोळीचा पर्दापाश करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, घटक –४, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेश गज्जल हे करीत आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस सह आयूक्त सो, (गुन्हे), ,श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त, (शोध–१) यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक/राजेश गज्जल, सपोनि/श्रीरंग गोसावी, पोउनि/अशोक पवार, सपोउनि/बबन बांडे, ( पोहवा/१६६० कुणाल परदेशी , पोहवा/७२३८ सुदीप भिगारदिवे,पो. नेमणूक – मध्यवर्ती पो.ठाणे ) , पो.हवा/अशोक थोरवे, पोहवा./मंगेश जाधव, पोहवा/प्रकाश पाटील, पोहवा/रितेश वंजारी, पोहवा/सतिश सपकाळे, पोहवा/राजेंद्र थोरवे, पो.हवा/योगेश वाघ, पोहवा/अमर कदम, पो.हवा/चंद्रकात सांवत , पोहवा/सुरेश जाधव, पोहवा/शेखर भावेकर, पोहवा/मिलींद हिंदूराव, पोहवा/गणेश गावडे, पोहवा/किशोर पाटील,पोशि/विक्रम जाधव, पोशि/बाबूलाल जाधव, पोशि/प्रसाद तोंडलीकर, पोशि/संजय शेरमाळे, पोशि/रेवणनाथ शेकडे, पो. शि/रामदास उगले, मपोहवा/मिनाक्षी खेडेकर, मपोना/कूसूम शिंदे, मपोशि/मनोरमा सावळे असे पोलीस पथकाने केली आहे.

Scanned with CamScanner